# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date: 19 November 2024
# Time: 7.10 to 7.20 AM
# Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक: १९ नोव्हेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

*ठळक बातम्या*

- **विधानसभा निवडणुकीसह नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचा प्रचार थांबला–उद्या मतदान**
- **राज्यभरात नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांसाठी एक लाख ४२७ मतदान केंद्रं**
- **ऑक्टोबरसाठी जीएसटी कर विवरणपत्रं भरण्यास २१ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ आणि**
- **आचारसंहिता कालावधीत राज्यात सुमारे ८० हजार जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई**

****

*सविस्तर बातम्या*

विधानसभा निवडणुकीसह नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचा प्रचार काल थांबला. राज्यात विधानसभेच्या २८८, तसंच नांदेड लोकसभेच्या एका जागेसाठी उद्या मतदान होणार आहे. राज्यभरातल्या नऊ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदारांसाठी, एक लाख ४२७ मतदान केंद्रं उभारण्यात आली आहेत. संवेदनशील मतदान केंद्रांवर केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

मतदानापूर्वीच्या या शांतता काळात, मतदारांवर प्रभाव पाडणाऱ्या, निवडणूक निकालावर परिणाम करणाऱ्या बाबी प्रदर्शित करण्यास निवडणूक आयोगाने माध्यमांना मनाई केली आहे. आता प्रचारसभा, मिरवणुका आयोजित केल्यास,

आयोजक आणि सहभागी अशा दोघांना दोन वर्षापर्यंत तुरुंगवास अथवा दंड अथवा दोन्ही, अशा शिक्षेची तरतूद असल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. या कालावधीत जाहिराती प्रसारित करतानाही नियमांचं पालन करण्याचे निर्देश आयोगानं उमेदवारांना आणि जाहिराती प्रसारित करणाऱ्यांना दिले आहेत.

प्रशासनाकडून मतदान प्रक्रियेची संपूर्ण तयारी झाली असून, राज्यातल्या मतदारांनी मोठ्या संख्येनं मतदान करण्याचं आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केलं आहे.

****

मतदान केंद्रावर मतदारांची ओळख पटवण्यासाठी मतदार ओळखपत्रासह इतर १२ पुराव्यांपैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. यामध्ये वाहन चालवण्याचा परवाना, पॅन कार्ड, आधार कार्ड, पासपोर्ट, मनरेगा जॉब कार्ड, बँक किंवा टपाल खात्याचं छायाचित्र असलेलं पासबुक, आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी अंतर्गत भारताचे महानिबंधक यांनी दिलेलं स्मार्ट कार्ड, विशिष्ट दिव्यांगत्व ओळखपत्र, आदींचा समावेश आहे.

****

नांदेड लोकसभा मतदार संघातल्या मतदारांना उद्या दोन वेळा मतदान करायचं आहे. एकाच मतदान केंद्रावर पहिलं मतदान लोकसभा पोटनिवडणुकीसाठी, तर दुसरं मतदान विधानसभा निवडणुकीसाठी असेल. जिल्ह्यातल्या सहा विधानसभा मतदार संघातल्या मतदारांनी याची खबरदारी घेण्याचं आवाहन करत, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी याबाबत सविस्तर माहिती दिली...

***Byte…***

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या सर्व नऊ मतदार संघातल्या मतदान केंद्रांवर आज दुपारपर्यंत मतदान साहित्य घेऊन मतदान पथकं पोहचणार असल्याची माहिती, जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली. काल छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत ते बोलत होते. एकूण १८ हजार १७८

मनुष्यबळ मतदान प्रक्रियेसाठी कार्यरत राहणार असून, त्यांच्या वाहतुकीसाठी सुमारे ११ हजार वाहनांची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती स्वामी यांनी दिली...

*Byte...*

****

जालना जिल्ह्यात पाचही विधानसभा मतदार संघातल्या मतदान केंद्रावर जाणाऱ्या निवडणूक पथकांची तिसरी सरमिसळ प्रक्रिया, काल निवडणूक आयोगाच्या ऑनलाईन प्रणालीद्वारे पूर्ण करण्यात आली. या प्रक्रियेनुसार, कोणत्या मतदान केंद्रावर कोणतं पथक जाईल, हे आज संबंधित पथकांना कळवण्यात येणार आहे. त्यानंतर ही पथकं मतदानाचं संपूर्ण साहित्य घेवून मतदान केंद्राकडे रवाना होणार असल्याचं, जिल्हा निवडणूक अधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितलं.

****

धाराशिव जिल्ह्यात विधानसभा निवडणूक शांततेत पार पडावी तसंच निवडणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिस यंत्रणेकडून, पाच पोलिस उप अधीक्षक, १८ पोलिस निरीक्षक, १०४ सहायक निरीक्षक आणि पोलिस उपनिरीक्षक, एक हजार ६०४ पोलिस शिपाई यांच्यासह एक हजार ४५० होमगार्ड तसंच १०३ एनसीसीचे कॅडेट असा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या बरोबरच केंद्रीय पोलीस पथकातील ४ तुकड्या इथं दाखल झाल्या आहेत.

****

दरम्यान, काल प्रचाराच्या शेवटच्या दिवशी, पत्रकार परिषदा, जाहीर सभा आणि रोड शो सोबतच पदयात्रा आणि मतदारांच्या गृहभेटी घेण्यावर उमेदवारांचा कल दिसून आला.

काँग्रेस नेते राहुल गांधी, भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी काल पत्रकार परिषदा घेत, आपल्या भूमिका मांडल्या.

****

माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांच्या गाडीवर दगडफेक झाली, यात यात अनिल देशमुख जखमी झाले आहेत. नागपूर ग्रामीणच्या काटोलच्या जलालखेडा भागात ही घटना घडली. अनिल देशमुख यांचे पुत्र सलील देशमुख हे काटोल मधून महाविकास आघाडीचे उमेदवार आहेत. या घटनेचात तपास सुरू असल्याचं, पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी सांगितलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गंगापूर मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार सुरेश सोनावणे यांच्यावरही काही अज्ञातांनी लांजी गावाजवळ दगडफेक केली. त्यात ते किरकोळ जखमी झाले. पोलिस पुढील तपास करत आहेत.

****

**या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरून देत आहोत**

****

चालू आर्थिक वर्षात ऑक्टोबरसाठी जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर विवरणपत्र तीन – बी भरण्याची मुदत महाराष्ट्र आणि झारखंड या राज्यांमध्ये एका दिवसानं म्हणजे २१ तारखेपर्यंत वाढवण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. जीएसटी अंमलबजावणी समितीच्या मान्यतेनंतर हा निर्णय घेण्यात आला.

****

विधानसभा निवडणूक आचारसंहिता कालावधीत राज्यात सुमारे ८० हजार जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. ५६ हजारांहून अधिक शस्र जमा केली असून, ६११ शस्र परवाने रद्द झाले आहेत. याच काळात ६६० कोटी रुपयांहून अधिक रकमेचा मुद्देमाल विविध ठिकाणच्या पथकांनी जप्त केला आहे. त्यात १५३ कोटी रुपयांहून अधिक रोकड, २८२ कोटी रुपयांहून अधिक रकमेचे मौल्यवान धातू यासह इतर गोष्टींचा समावेश आहे.

****

उद्या बुधवारी २० तारखेला सर्वांनी मतदान करण्याचं आवाहन अभिनेत्री शिवाली परब यांनी केलं आहे...

*Byte...*

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने, मनपा हद्दीमध्ये असलेल्या चार विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी एक आदर्श मतदान केंद्र तयार करण्यात आलं आहे. या मतदान केंद्रात प्रतीक्षागृह, पाळणाघर, पिण्याचं पाणी, आरोग्य सुविधा, सेल्फी पॉईंट, यासाह सर्व सोयीसुविधा उपलब्ध असतील. स्वागत कक्षामध्ये मतदारांना यादीत नाव शोधण्यापासून बुथची माहिती सांगण्यासाठी नववी-दहावीच्या विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून नेमण्यात आलं आहे. विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेची माहिती व्हावी, हा या मागचा उद्देश आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आतापर्यंत चार हजार ७१ मतदारांनी गृहमतदान केलं असून, हे प्रमाण ७९ टक्के इतकं आहे. टपाली मतदान नऊ हजार ६९९ एवढं झालं असून, त्याचं प्रमाण ७३ टक्के असल्याचं, निवडणूक कार्यालयाकडून सांगण्यात आलं.

****

धाराशिव जिल्ह्यात उमरगा मतदारसंघात ८५ वर्षावरील ६१३ आणि १९४ दिव्यांग अशा एकूण ८०७ मतदारांनी नोंदणी केली होती. यापैकी ७६९ मतदारांनी गृह मतदानाचा हक्क बजावला.

****

परभणी विधानसभा मतदार संघाचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार डॉ राहुल पाटील यांच्या प्रचाराचा शेवट काल ऑटो रिक्षा रॅली आणि दिव्यांगांच्या रिक्षा रॅलीने तर शिवसेना पक्षाचे उमेदवार आनंद भरोसे यांच्या प्रचाराचा समारोप चित्र रथाच्या रॅलीने करण्यात आला.

****

उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे यांच्या प्रचाराची सांगता काल बाईक रॅलीनं करण्यात आली. या बाईक रॅलीचं नेतृत्व पिंगळे यांच्यासह तुळजापूर विधानसभा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार राणा जगजीतसिंह पाटील यांनी केलं.

****

औरंगाबाद पूर्व मतदार संघातले महायुतीचे उमेदवार अतुल सावे यांनी, तसंच औरंगाबाद मध्यचे महायुतीचे उमेदवार प्रदीप जैस्वाल यांनी वाहन रॅली काढून प्रचाराची सांगता केली. औरंगाबाद मध्यचे महाविकास आघाडीचे उमेदवार

बाळासाहेब थोरात यांनी काल मतदारांना मोबाईलवरून ध्वनिमुद्रण ऐकवून प्रचार केला.

औरंगाबाद पश्चिम चे महायुतीचे उमेदवार संजय शिरसाठ तसंच महाविकास अघाडीचे याच मतदार संघातले उमेदवार राजू शिंदे यांनी जनसंवाद साधत आपल्या प्रचाराचा समारोप केला.

****

लातूर शहर मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार अमित देशमुख यांनी सिने अभिनेते रितेश देशमुख यांच्यासोबत शहरात एक सभा घेतली त्यानंतर गंजगोलाई परिसरात रोड शो केला. लातूर शहर मतदारसंघातल्या भाजपच्या उमेदवार डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनी पदयात्रेने प्रचाराचा शेवट केला. लातूर शहरातले वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विनोद खटके यांनी सभा घेत मतदारांना साद घातली.

****